१२. संतवाणी

(अ)

संत एकनाथ (१५३३ ते १५९९) : भागवत संप्रदायातील थोर संतकवी. सोळाव्या शतकातील महाराष्ट्राच्या सांस्कृतिक प्रबोधनाचे प्रवर्तक. 'एकनाथी भागवत', 'रुक्मिणी स्वयंवर', 'भावार्थ रामायण' इत्यादी ग्रंथ, अभंग, आख्याने, गौळणी, पदे, भारुडे अशी त्यांची विविध स्वरूपाची खूप लेखनसंपदा आहे. बहुश्रुतता, सामान्यांच्या उद्धाराची तळमळ, आलंकारिकता, पौराणिक कथासंदर्भ, सुबोधता हे संत एकनाथ महाराजांच्या काव्याचे प्रमुख विशेष होत.

प्रस्तुत अभंगात माता आणि बाळ यांच्या उदाहरणातून गुरुचे शिष्याबद्दलचे वात्सल्य पटवून दिलेले आहे.

- **ऐका. वाचा. म्हणा.**

बाळाचे छंद जाण ।
माता पुरविती आपण ।।१।।

बोबडे बोलतां ते बोल ।
माते आनंद सखोल ।।२।।

मागे जें तें दे आपण ।
आळ पुरवी त्यासी देऊन ।।३।।

एकाजनार्दनीं ममत्व तें ।
नोहे लौकिकापुरतें ।।४।।

सकलसंतगाथा खंड दुसरा : संत एकनाथ महाराजांची अभंगगाथा
अभंग क्रमांक २२३७
संपादक : प्रा. डॉ. र. रा. गोसावी

भावार्थ : आईची आपल्या बाळावर नितांत माया असते. बाळाशी ती एवढी एकरूप झालेली असते, की त्याची इच्छा त्याने न सांगताच तिला कळते. बाळाचे बोबडे बोल ऐकून मातेला अंत:करणापासून अतिशय आनंद होतो. माता आपल्या बाळाचे सर्व हट्ट पूर्ण करते. संत एकनाथ महाराजांना आपले गुरू जनार्दन स्वामी यांच्या ठिकाणी मातेचे वात्सल्य अनुभवास येते. संत एकनाथ महाराज म्हणतात, की गुरू जनार्दनाचे आपल्याबद्दलचे ममत्व हे मातेच्या वात्सल्यासारखेच सखोल आणि अंत:करणापासूनचे आहे. सद्गुरू जणू माऊलीच आहेत. त्यांचे प्रेम अलौकिक आहे.

शब्दार्थ : सखोल – अतिशय खोल. **आळ** – इच्छा, हट्ट. **ममत्व** – प्रेम. **नोहे** – नाही. **लौकिकापुरते** – दाखवण्यापुरते.

(आ)

संत श्रीनिळोबा (अंदाजे १६७५ ते १७५३) : संत श्रीनिळोबाराय हे संत तुकाराम महाराज यांचे शिष्य. संत तुकाराम महाराज यांची अभंगवाणी त्यांच्या नित्यपठणात असे. त्या अभंवाणीतूनच त्यांना काव्यप्रेरणा मिळाली. त्यांच्या अभंगांची भाषा सुबोध व रसाळ आहे. त्यांनी तेराशेहून अधिक अभंगांची रचना केली. प्रस्तुत अभंगातून देव आणि भक्त यांची एकरूपता विविध उदाहरणे देऊन त्यांनी स्पष्ट केलेली आहे.

- **ऐका. वाचा. म्हणा.**



आमोद न सोडी कर्पुर ।
किंवा प्रभेतें रविकर ।।१।।

तैसेचि देव आणि भक्त ।
येरयेरीं विराजित ।।२।।

जेंवि साखरेतें गोडी ।
चंदन सौरभ्या न सोडी ।।३।।

निळा म्हणे अवकाश नभ ।
दोन्ही एकचि ते स्वयंभ ।।४।।

सकलसंतगाथा खंड दुसरा : संत श्रीनिळोबामहाराजांची अभंगगाथा
अभंग क्रमांक ७८०
संपादक : प्रा. डॉ. र. रा. गोसावी

भावार्थ : देव आणि भक्त यांची एकरूपता पटवून देताना संत श्रीनिळोबा महाराज म्हणतात, की ''कापूर सुगंधाला सोडत नाही, रविकिरण तेजाला, प्रकाशाला सोडत नाही आणि ते एकमेकांमुळे शोभून दिसतात, तसेच ज्याप्रमाणे साखर गोडीला सोडत नाही, चंदन सुगंधाला सोडत नाहीत, नभ अवकाशातच समाविष्ट असतात, त्याचप्रमाणे देव आणि भक्त यांचे नाते अतूट असते. ते सदैव परस्परांच्या सान्निध्यात राहतात आणि परस्परांचे मोठेपण वाढवतात.''

शब्दार्थ : **आमोद** – सुगंध सुवास. **कर्पुर** – कापूर. **प्रभेतें** – तेजाला, प्रकाशाला. **रविकर** – सूर्यकिरण. **येरयेरीं** – हा; तो; जवळचा (पूर्ण वाक्यात ज्याचा निर्देश केला आहे तो.) **विराजित** – शोभणे, प्रकाशणे. **जेंवि** – ज्याप्रमाणे. **सौरभ** – सुगंध. **अवकाश** – मोकळी जागा, पोकळी. **स्वयंभ** – स्वत: उत्पन्न होणारा.

QDBM8A

काही पूरक पुस्तके व संदर्भ ग्रंथ

(१) बहिणाबाईंची गाणी– बहिणाबाई चौधरी
(२) फकिरा– अण्णा भाऊ साठे
(३) पूर्वरंग– पु. ल. देशपांडे
(४) विशाखा (कवितासंग्रह)– कुसुमाग्रज
(५) गभरेशीम– इंदिरा संत
(६) तराळ–अंतराळ– शंकरराव खरात
(७) पक्षी जाय दिगंतरा– मारुती चितमपल्ली
(८) फिरस्ती– उत्तम कांबळे
(९) आमचा बाप आणि आम्ही– डॉ. नरेंद्र जाधव
(१०) मजेत जगावं कसं?– शिवराज गोर्ले
(११) मास्तरांची सावली– कृष्णाबाई सुर्वे
(१२) निसर्गायन– दिलीप कुलकर्णी
(१३) जोहड– सुरेखा शहा
(१४) पत्रास कारण की....– अरविंद जगताप
(१५) विविध शब्दकोश आणि मराठी विश्वकोश

महत्त्वाची संकेतस्थळे व लिंक्स

https://youtu.be/fvrQs5lULyI
en.wikipedia.org/wiki/Stephen_Hawking
https://mr.wikipedia.org/wiki/शंकर_वैद्य
https://mr.wikipedia.org/wiki/संत_तुकाराम
https://www.maayboli.com/node/47569

शिक्षकांनी पाठ्यपुस्तकात दिलेली पूरक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, संकेतस्थळे व लिंक्स यांचा वापर करून पाठ्यघटकाशी संबंधित माहिती मिळवावी. त्या माहितीचा अध्यापनात संदर्भ म्हणून वापर करावा.

- खालील चित्राचे निरीक्षण करा. चित्रातील हे दृश्य पाहून सूचनांचे फलक तयार करा.

- खालील चौकटींत काही म्हणींचे अर्थ दिले आहेत ते वाचा. त्यावरून म्हणी ओळखा व लिहा.

न आवडणाऱ्या माणसाने कितीही चांगली गोष्ट केली, तरी ती वाईट दिसते. त्या व्यक्तीचे काम आवडत नाही.

एखाद्या माणसाला काम करता येत नसले, की तो कारणे देत असतो.

एखादी गोष्ट तत्काळ व्हावी याकरिता काही लोक उतावळेपणाने जे उपाय करतात त्यांना हे म्हटले जाते.

जे समोर दिसते त्यासाठी कोणत्याही पुराव्याची गरज भासत नसते.



















- पाठ्यपुस्तक मंडळाची वैशिष्ट्यपूर्ण पाठ्येत्तर प्रकाशने.
- नामवंत लेखक, कवी, विचारवंत यांच्या साहित्याचा समावेश.
- शालेय स्तरावर पूरक वाचनासाठी उपयुक्त.

पुस्तक मागणीसाठी www.ebalbharati.in, www.balbharati.in संकेत स्थळावर भेट द्या.

साहित्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे.

ebalbharati

विभागीय भांडारे संपर्क क्रमांक : पुणे - ☎ २५६५९४६५, कोल्हापूर- ☎ २४६८५७६, मुंबई (गोरेगाव) - ☎ २८७७१८४२, पनवेल - ☎ २७४६२६४६५, नाशिक - ☎ २३९१५११, औरंगाबाद - ☎ २३३२१७१, नागपूर - ☎ २५४७७१६/२५२३०७८, लातूर - ☎ २२०९३०, अमरावती - ☎ २५३०९६५



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

मराठी सुगमभारती इ. ८ वी

₹ ३०.००